मा. न्यायालयीन प्रत.

आर्थिक गुन्हे / पोलीस ठाणे पाचोड जि. औरंगाबाद

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** पाचोड **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0054 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/02/2021 23:20 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 26/02/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2021
   **Time From (वेळेपासून):** 15:47 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/02/2021 **Time (वेळ):** 23:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/02/2021 23:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जयभद्रा जनरल स्टोअर, पाचोड जि

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दत्तात्रय रामभाऊ धुळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डोमेगाव ,अंबड ,पाचोड,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | डोमेगाव ,अंबड ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीपाद गंगाधर मोताळे मंडळ अधिकारी जामखेड | | | 1. देऊळगाव राजा जिबुलढाणा,,हमुसमर्थ नगर प्लट क्र23A ज,जालना ,कदीम - जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4,000/ रुपये लाचेची रक्कम न्धासिन पावडर लागलेली | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना दिनांक 26.02.2021.मी दत्तात्रय पिता रामभाऊ धुळे वय 46 वर्ष व्यवसाय शेती रा.डोमेगांव ता.अंबड जि.जालना मोबाईल 9881038931.समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना कार्यालयात हजर राहुन तोंडी फिर्याद देतो की,मी वरील प्रमाणे राहणारा असुन शेती व्यवसाय करुन कुट◌ुबाचा उदर निर्वाह भागवितो.मला तीन मोठे भाऊ प्रभाकर, विष्णु, विठ्ठल असे असुन माझे वडील दिड वर्षापुर्वी मयत झाले आहे.वडीलांचे नावावर मौजे डोमेगांव शिवारात शेत गट क्रमांक 33 मध्ये 01 हेक्टर 20 आर शेत जमीन आहे.सदर जमीनीचा फेर माझे व माझे भावांचे नावाने आठ महिन्यापुर्वी लावण्यात आला आहे. त्यानंतर सदर जमीनीचे क्षेत्र विभागणी करण्यासाठी मी मागील सहा महिन्या पासुन मंडळ अधिकारी श्री.मोताळे व तलाठी श्री गजरे यांना भेटुन क्षेत्र विभागणी करण्यासाठी वांरवांर विनंती करीत आहे परंतु ते टाळाटाळ करीत आहेत.काल दिनांक 25/02/2021 रोजी मी अंबड येथे जाऊन मा.तहसिलदार साहेब अंबड यांना महसुल अधिनियम कलम 85 प्रमाणे क्षेत्र विभागणी साठी अर्ज दिला व मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे यांना भेटुन माझे व माझे भावांचे नावाने क्षेत्र विभागणी करण्याचे कामासाठी विनंती केली असता त्यांनी मला दहा हजार रुपये दया मी तुमचे काम करुन देतो असे म्हणाले. माझी मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे यांना लाच दयायची इच्छा नाही परंतु लाच दिली नाही तर ते माझे काम करणार नाही. मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. तसेच मंडळ अधिकारी श्री.मोताळे हे मागणी करणार असलेले पैसे मी सोबत आणलेले आहेत.मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. आज दिनांक 26.02.2021 रोजी मी मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे यांना भेटण्यासाठी जाणार असुन त्यावेळी मी त्यांना माझे व माझे भावांचे नावाने क्षेत्र विभागणी करण्याचे कामासाठी विनंती करणार आहे. त्यावेळी मंडळ अधिकारी श्री. श्रीपाद मोताळे यांनी मला किती लाचेची मागणी करतात याबदल खात्री करुन त्यांनी स्वत: किंवा इतरा मार्फत लाच स्विकारल्यास त्यांना पकडून कारवाई करावी अशी तक्रार दिली होती. त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी माझी तक्रार संगणकावर टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन देवुन त्यावर माझी व पंचाची सही घेतली.त्यानंतर लागलीच सदर तक्रार मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे साहेब यांचे विरुध्द केलेली खरी आहे काय व श्री मोताळे साहेब हे माझ्याकडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी,लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी पोनि श्री.शेख साहेब,पंच व सापळा पथक असे लाप्रवि जालना येथुन शासकिय वाहनाने झालो.अंबड येथे जावुन मी पोनि श्री.शेख यांच्या सुचने वरुन मंडळ अधिकारी श्री.मोताळे यांना फोन लावुन भेटायला कोठे येवु असे विचारले असता त्यांनी मला औरंगाबाद ते सोलापुर जाणारे रोडवर टोल नाक्याच्या पुढे हटेल कल्पतरु येथे येण्यासाठी सांगितले.त्यावरुन पोनि श्री.शेख साहेब,पंच व सापळा

पथक असे औरंगाबाद ते सोलापुर जाणारे रोडवर टोल नाक्या जवळ सुरक्षित ठिकाणी थांबलो व त्यानंतर सदर ठिकाणाहुन माझ्या सोबत पंच श्री.अनंता भुतेकर यांना देण्यात आले.माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते.त्यानंतर मी भोकरवाडी शिवारातील कल्पतरु हॉटेलवर जावुन मंडळ अधिकारी श्री.मोताळे यांची भेट घेतली असता त्यांनी माझे व माझे भावांचे नावाने क्षेत्र विभागणी करण्याचे कामासाठी मला प्रथम सहा हजार रुपये लाचेची मागणी केली.तडजोडी अंती चार हजार रुपये लाच मागणी करुन पाचोड येथील माझे जयभद्रा जनरल स्टोअर्स वर येवुन स्विकारणार असल्याचे सांगितले तसा लाच मागणी पडताळणी पंचनामा सापळा पथकाने केला. त्यावरुन आज दिनांक 26.02.2021 रोजी ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.शेख यांनी व त्यांचे पथकाने मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे साहेब यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविण्यात आले.पाचोड शिवारातील पाचोड ते अंबड जाणारे रोडच्या बाजुला सुरक्षीत ठिकाणी शासकीय वाहनामध्ये अंथ्रासीन पावडरची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. मंडळ अधिकारी श्री. मोताळे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेल्या पैशातुन पाचशे रुपये दराच्या आठ नोटा वेगळे काढुन त्यांचे क्रमांक लिहुन घेवुन 4,000/- रु रक्कमेवर अंथ्रासीन पावडर लावले.मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे साहेब यांना देण्यासाठी थ्रसीन पावडर लावलेले पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवले.सर्वांना त्यांचे कामे समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी मला सुचना दिल्या की,श्री.श्रीपाद मोताळे यांनी लाच स्विकारल्यानंतर तुम्ही दुकानाबाहेर येवुन तोंडाचा रुमाल काढुन तोंड पुसुन ईशारा करण्याचे सुचना दिल्या. त्यावरुन मला व पंच श्री. अनंता भुतेकर यांना माझे दुकानावर थांबण्यास सांगुन त्याठिकाणी माझे पाचोड येथील सरकारी दवाखान्याचे विरुध्द बाजुस असलेले जयभद्रा जनरल स्टोअर्स दुकानाचे परिसरात पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं.2 श्री.बद्रीविशाल जोशी असे येवुन सर्व जण एकमेकांना दिसतील अशा प्रकारे थांबले श्री.मोताळे यांचे विरुध्द सापळा लावण्यात आला.मी व पंच श्री.अनंता भ्ुतेकर असे दोघे माझे जनरल स्टोअर्स दुकानात थंाबलो असता थोड्या वेळाने श्री.श्रीपाद मोताळे हे मोटार सायकलने माझे जनरल स्टोअर्स दुकानावर आले व श्री. मोताळे साहेब यांनी माझे दुकानात माझेकडुन पावणे चार ते चार वाजेचे सुमारास चार हजार रुपये माझे जवळुन घेवुन मोजुन घेतले व त्यांचे पॅंटचे समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवले.त्यावेळी पंच श्री.अनंता भुतेकर हे समक्ष हजर होते.त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे इशारा केला तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. बद्रीविशाल जोशी असे लगेच पाठीमागुन त्याठिकाणी येवुन मंडळ अधिकारी श्री.मोताळे यांना ताबडतोब पकडले.मला पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी जवळ बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री.चेके यांनी बंद केला तसेच पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी श्री.मोताळे यांना त्यांची स्वत:ची व सर्वांची ओळख करुन दिली.पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी श्री.श्रीपाद मोताळे यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.श्रीपाद गंगाधर मोताळे वय 54 वर्षे व्यवसाय नोकरी मंडळ अधिकारी, महसुल विभाग जामखेड, तहसिल कार्यालय, अंबड, रा.प्लाट क्रमांक 23-A, श्रध्दा निवास, समर्थ नगर, जालना असे सांगितले. तेव्हा त्यांची तेथेच पंचासमक्ष अंगझडती घेवुन त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम पाचशे रुपये दराच्या आठ नोटा एकुण चार हजार रुपये पंचासमक्ष जप्त केले तसेच त्यांचे दोन्ही हाताचे तळव्यावर व बोटाचे पेऱ्यावर ल्ट्राव्हायलेट लॅंपच्या प्रकाशात तपासनी केली असता त्यांचे हातावर व पैंटशावर हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली व माझे हात तपासण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब, स्टाफ, दोन्ही पंच, मी व मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद मोताळे यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो.सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी दिनांक 26.02.2021 रोजी पावणे चार ते चार वाजणेचे सुमारास पाचोड येथील सरकारी दवाखान्याचे समोरील माझे जयभद्रा जनरल स्टोअर्स दुकानामध्ये श्री.श्रीपाद मोताळे यांनी माझे व माझे भावांचे नावाने क्षेत्र विभागणी करण्याचे काम करण्यासाठी पंच श्री.अनंता भुतेकर यांचे समक्ष 4,000/- रुपयेची लाच स्विकारली तेव्हा रंगेहात पकडण्यात आले आहे.त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करावी ही विनंती. मी दिलेली फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): श्री. एस. एस. शेख पो.नि **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ~~Gorakhnath Rohidas Kharad~~

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी)

**Name** (नाव): पोलीस निरीक्षक

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): API

पो.स्टे.पाचोड